# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
# कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ जानेवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २७/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशाह, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, ब्रम्हपुरी, भिसी, नागभिड, तळोधी, मुल, सिंदेवाही, पोंभुर्णा, राजुरा, कोरपना** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२६** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १८ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **२९,५४,१००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर :—**

दिनांक **२७/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर** अंतर्गत रामटेके वाडी येथे ०६ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **चंद्रपुर शहर** येथे अप. क्र. **१११/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०६ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **९,६६०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **चंद्रपुर शहर** पोलीस करीत आहे.

---

**२)पोलीस स्टेशन सावली :—**

दिनांक **२७/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **सावली** अंतर्गत मौजा कवळी येथे १० आरोपी ईसम हे कोंबडयाच्या झुंजीवर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **सावली** येथे अप. क्र. **५२/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील १० आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **४,६२,१९०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **सावली** पोलीस करीत आहे.

---

# चंद्रपुर शहर पोलीसांची कार्यवाही

## चोरीच्या गुन्हयातील ०२ आरोपीसह ०४ मोटारसायकली हस्तगत

दिनांक १६/०१/२०१९ रोजी फिर्यादी नामे जितेंद्र दिनानाथ द्विवेदी रा. बालाजी वार्ड चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे रिपोर्ट दिली की, ते आपल्या मित्राची मोटारसायकल **क्र. एमएच ३४ एक्यु ८१२९** ही समाधी वार्ड चंद्रपुर येथे ठेवुन बाहेरगावी गेले होते. कामावरून परत आल्यानंतर फिर्यादी यांना ती मोटारसायकल ठेवलेल्या ठिकाणी मिळुन न आल्याने फिर्यादीच्या तक्रारीवरून पोस्टे चंद्रपुर शहर येथे अप.क्र. १०६/२०१९ कलम ३७९, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

चोरीचा गुन्हा नोंद होताच तपासादरम्यान गोपनीय माहिती मिळाली की, एका इसमाच्या घरी संशयीतरित्या ०४ वाहन उभी आहे आणि दोन इसम त्यातील एका वाहनाचे स्पेअर पार्ट्स काढत आहे. अशा माहितीवरून पोलीस पथक तात्काळ रवाना होवुन संशयीताच्या घरी झडती घेतली असता दोन इसम वाहनाचे स्पेअर्स पार्ट्स काढत असतांना दिसुन आले. यावरून दोन्ही इसमास विचारपुस केली असता त्यांनी हे चारही वाहन चोरून आणल्याची कबुली दिल्याने आरोपी नामे १) कार्तीक राजु खंडाळे वय १९ वर्ष, रा. विठ्ठल मंदीर वार्ड चंद्रपुर, २) अर्जुन उर्फ सचिन विनोद निरसकर वय २३ रा. लहुजी नगर पडोली चंद्रपुर यांना अटक करण्यात आले आहे. सदर आरोपीतांकडुन ०४ मोटारसायकली **एकुण किंमत १,८०,०००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन पुढिल तपास चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. सुशिलकुमार नायक यांचे नेतृत्वात पोनि. श्री. एस.एस भगत, पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर यांचे सह सपोनि. रहांगडाले, पोहवा चालेकर, रंगारी, पोना. प्रकाश बल्की, आतकुलवार, सानप, वाघमोडे, पोशि. रोडे, चुनारकर, बुटले, डोंगरे यांनी पार पाडली.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# कोळसा व ट्रक सह २२ लाखाचा मुद्देमाल जप्त
## रामनगर पोलीसांची कार्यवाही

दिनांक २८/०१/२०१९ रोजी फिर्यादी नामे मोहम्मद नसीम जमाल खान वय ४२ रा. रयतवारी कॉलरी चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन रामनगर येथे तक्रार दिली की, त्यांच्या मालकीचा चौदा चाकी कोळसा भरून असलेला ट्रक क्रमांक एम एच ३४ एबी ९५३४ हा लखमापुर येथुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र ११२/२०१९ कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच पोलीस स्टेशन रामनगर येथील गुन्हे शोध पथकाने तपासाची चक्रे गतीमान करीत माहिती काढण्यास सुरवात केली. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार एमआयडीसी दाताळा येथे जावुन तपास केला असता चोरीस गेलेला ट्रक क्रमांक एम एच ३४ एबी ९५३४ हा कोळशासह मिळुन आला. यातील आरोपी हा सध्या फरार असुन तपास रामनगर पोलीस करीत आहे. सदर गुन्हयात ट्रक किंमत २२,००,०००/—रू आणि ३१ टन कोळसा किंमत. ६२,४८६/—रू असा एकुण २२,६२,४८६/— चा माल जप्त केला आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात श्री. सुशिलकुमार नायक, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचे नेतृत्वात पोलीस निरिक्षक श्री. अशोक कोळी यांचे सह सपोनि. श्री. दरेकर, पोहवा पाटील, डोईफोडे, नापोशि राठोड, पोशि माजीद यांनी पार पाडली.

———————————————————————————————————